PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 4, ISSUE 1

"विदर्भातील लोकसंख्येचे विश्लेषन"

डॉ. तिलकंचद जि. धोटे

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालय,

शेंदुरजना घाट, जिल्हा अमरावती

महाराष्ट्र भारत

सारंश :

महाराष्ट्रातील पूर्व व पश्चिम विदर्भातील लोकसंख्येचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. कारण या भागातील लोकसख्येचे प्रमाण वाढलेले आहे. लोकसंख्या वाढीमुळे अनेक अगणित समस्या स्थानिक, राज्यीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर निर्माण होत आहे. एवढेच नाही तर त्या समस्या झपाट्याने वाढत आहे. या वाढत्या लोकसंख्येमुळे मानवाच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे.

विदर्भातील लोकसंख्येचे विश्लेषण पाहता वाशिम, बुलढाणा व नागपुर या जिल्ह्यातील लोकसंख्या वाढ इतर आठ जिल्ह्याच्या मानाने जास्त दिसून येते.

प्रस्तावना :

विदर्भात एकंदरीत 11 जिल्ह्यांचा समावेश होतो. ते म्हणजे नगापुर, चंद्रपुर, गोंदिया, भंडारा, वर्धा, गडचिरोली, अमरावती अकोला, वाशिम, बुलढाणा व यवतमाळ होय. या भागात वाढणारी लोकसंख्या अनेक समस्यांना जन्म देत आहे. उपासमार, वस्ती, बेरोजगारी, कृषी जमिनी, रोजगार, गलिच्छ वस्ती, शेतकरी आत्महत्या इ. समस्या या विदर्भात प्रामुख्याने जाणून येत आहे.

त्यामुळे या समस्येवर मात करण्यासाठी विदर्भातील लोकसंख्येचा अभ्यास करुन त्यावर योग्य उपाययोजना साधने हेच या अभ्यासामागील कारण सांगता येईल.

विदर्भातील वाढत्या लोकसंख्येचा विचार केल्यास एका वर्षात 237285.2 इतकी लोकसंख्या तर एका दिवसात 660 व एका तासात 27.48 इतकी लोकसंख्या वाढलेली दिसून येत आहे. म्हणून " विदर्भात प्रजोत्पादन करणे हा विदर्भातील सर्वात मोठा कुटीर उद्योग बनला आहे." असे म्हणने वावगे ठरणार नाही.

अभ्यास क्षेत्र :

विदर्भ हा महाराष्ट्रच्या पुर्वेला वसलेला आहे. यात एकुण 11 जिल्ह्याचा समावेश होतो.तसेच यात नागपुर व अमरावती असे विभाग पडून नागपुर विभागला पुर्व विदर्भ व अमरावती विभाला पश्चिम विदर्भ म्हणुन ओळखल्या जाते.

विदर्भाचा अक्षवृत्तीय विस्तार 17^0 51' उत्तर ते 21^0 46' उत्तर तर रेखावृत्तीय विस्तार 75^0 57' पुर्व ते 77^0 74' पूर्व असुन एकुण भौगोलिक क्षेत्रफळ 97404 चौ.की.मी. आहे. विदर्भाच्या उत्तरेस मध्यप्रदेश पुर्वेस छत्तीसगढ, दक्षिणेस आंध्रप्रदेश व पश्चिमेस मराठवाडा विभाग आहे. वर्धा - वैनगंगा-पैनगंगा नदीच्या खो-यांचा प्रदेश म्हणजेच विदर्भ अभ्यास क्षेत्र आहे.

उदिष्ट्ये :

1) विदर्भातील 2001 च्या तुलनेत 2011 मध्ये झालेली लोकसंख्या वाढ व घट अभ्यासणे.

2) विदर्भातील 2001 व 2011 मध्ये प्रत्येक जिल्ह्यात लोकसंख्येचे टक्केवारी प्रमाण विचारात घेणे.

कार्यपध्दती :

विदर्भातील एकुण लोकसंख्या विचारात घेवून वाढ व घट दर्शविण्यासाठी तसेच विदर्भातील प्रत्येक जिल्ह्यानुसार असलेले लोकसंख्येचे प्रमाण दाखविण्यासाठी सुत्र व आलेख उपयोग केला आहे. शोधनिंबधात घेतलेली आकडेवारी हि व्दितीयस्त्रोतातुन घेतलेली आहे.

विषय विवेचन :

PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 4, ISSUE I

विदर्भातील लोकसंख्या व वाढ

	वर्ष	2001		2011		
अ.क्र.	जिल्हे	लोकसंख्या	टक्केवारी	लोकसंख्या	टक्केवारी	वाढ/घट
1	नागपुर	4067637	46.64	4653171	53.36	+6.72
2	चंद्रपुर	2071101	48.56	2194262	51.44	+2.88
3	गोंदीया	1200707	47.59	1322331	52.41	+4.82
4	वर्धा	1236157	48.82	1296157	51.18	+2.36
5	भंडारा	1136146	48.66	1198810	51.34	+2.68
6	गडचिरोली	970262	47.52	1071795	52.48	+4.96
7	अमरावती	2607160	47.45	2887826	52.55	+5.10
8	यवतमाळ	2458271	46.97	2775457	53.03	+6.06
9	बुलढाणा	2232431	46.32	2588039	53.68	+7.36
10	अकोला	1629633	47.26	1818617	52.74	+5.48
11	वाशिम	1020822	46.04	1196714	53.96	+7.92
	एकुण	20630327	47.28	23003179	52.72	+5.44

तक्ता क्र. 1

उदा. नागपुर 4067637+4653171 = 8720808

$$\frac{4067637 \times 100}{8720808}$$



विदर्भातील जिल्ह्यांचा दोन्ही वर्षातील लोकसंख्येचा आढावा घेतल्यास असे लक्षात येते की, लोकसंख्येची सरासरी वाढ ही 5.44% इतकी आहे. 2001 च्या तुलनेत 2011 च्या विदर्भाच्या वाढीव लोकसंख्येचा अभ्यास केला असता सर्वात जास्त वाढ हि वाशिम जिल्ह्यात 7.92% आहे तर त्याच खालोखाल वाढ ही बुलढाणा, नागपुर व यवतमाळ मध्ये अनुक्रम 7.36%, 6.72 % व 6.06 % तर सर्वात कमी लोकसंख्या वाढ वर्धा जिल्ह्यात 2.36 % इतकी असुन भंडारा व चंद्रपुर येथे अनुक्रमे 2.68 % व 2.88 % इतकी दिसुन येते. तर इतर बाकीच्या जिल्ह्यात हे प्रमाण मध्यम स्वरुपात वाढलेले आढळून येत आहे.

विदर्भातील नागपुर विभागचे म्हणजेच पुर्व विदर्भाचे सरासरी लोकसंख्या वाढ प्रमाण 4.07 % असुन अमरावती विभागचे म्हणजेच पश्चिम विदर्भाचे सरासरी लोकसंख्या वाढ प्रमाण 6.39 % लक्षात येत आहे. अमरावती विभागत नागपुर विभागपेक्षा लोकसंख्या वाढ प्रमाणत 2.31 % जास्त आहे.

विदर्भातील लोकसंख्येचे वर्षानुसार प्रमाण

विदर्भाची 2001 व 2011 ची एकुण लोकसंख्या अभ्यासात घेतलेली आहे. या दोन्ही जनगणना वर्षानुसार विदर्भात प्रत्येक जिल्ह्यात एकुण किती टक्के लोकसंख्या समावलेली आहे हे दाखविण्याचा प्रयत्न खालील तक्त्यात केलेला आहे.

अ.क्र.	जिल्हे	लोकसंख्या 2001	लोकसंख्येची टक्केवारी	लोकसंख्या 2011	लोकसंख्येची टक्केवार
1	नागपुर	4067637	19.72	4653171	20.28
2	अमरावती	2607160	12.64	2887826	12.55
3	यवतमाळ	2458271	11.92	2775457	12.06
4	बुलढाणा	2232431	10.82	2588039	11.25
5	चंद्रपुर	2071101	10.04	2194262	9.53
6	अकोला	1629633	7.90	1818617	7.90
7	वर्धा	1236157	5.99	1322331	5.74
8	गोंदिया	1200707	5.82	1296157	5.63

9	भंडारा	1136146	5.51	1198810	5.21
10	वाशिम	1020822	4.94	1196714	5.20
11	गडचिरोली	970262	4.70	1071795	4.65
	एकुण	20630327	100	23003179	100

तक्ता क्र. 2

विदर्भाची 2001 ची एकुण लोकसंख्या व त्या लोकसंख्येचे प्रमाण (टक्केवारीत) तक्ता क्र. 2 मध्ये दर्शविलेले आहे. या तक्त्यात उतरत्या क्रमाने लोकसंख्येचे प्रमाण जिल्ह्यानुसार दाखविण्यात आले आहे. 2001 नुसार विदर्भात सर्वात जास्त लोकसंख्या प्रमाण नागपुर जिल्ह्यात असून ते 19.72 % तर

सर्वात कमी प्रमाण गडचिरोली जिल्ह्यात 4.70 % ऐवढेच होते. अमरावती, यवतमाळ, बुलढाणा, चंद्रपुर या जिल्ह्यात अनुक्रमे 12.64 %, 11.92 %, 10.82 % व 10.04 %लोकसंख्या वसलेली होती. तर इतर जिल्ह्यात लोकसंख्या वसण्याचे प्रमाण कमी प्रमाणात दिसून येत आहे.





तक्ता क्र. 2 वरुन असे लक्षात येते की, विदर्भात 2011 च्या जनगणनेनुसार सर्वात जास्त लोकसंख्या प्रमाण नागपुर जिल्ह्यात असुन ते 20.28 % एवढे आहे. अमरावती, यवतमाळ, बुलढाणा या जिल्ह्यात एकुण लोकसंख्या प्रमाण हे 11 % ते 13 % च्या दरम्यान दिसून येत आहे. चंद्रपुर व अकोला जिल्ह्यात लोकसंख्येचे प्रमाण अनुक्रमे 9.13 % व 7.90 % दिसून येत आहे. तर इतर उरलेल्या तहसील मध्ये 4 % ते 6 % आत लोकसंख्या प्रमाण आढळून येत आहे. सर्वात कमी प्रमाण गडचिरोली जिल्ह्यात 4.65 % ऐवढे आहे.

वरील आकृतीवरुन एंकदरीत लोकसंख्येचे दोन्ही वर्षानुसार प्रमाण अभ्यासल्यास असल्यास असे लक्षात येते की, 2011 मध्ये नागपुर, यवतमाळ, बुलढाणा व वाशिम जिल्ह्यात 2001 च्या तुलनेत 2011 मध्ये लोकसंख्या प्रमाणाची टक्केवारी वाढलेली दिसून येत आहे. तर अमरावती, चंद्रपुर, गोंदिया, वर्धा, भंडारा व गडचिरोली या जिल्ह्यात 2011 मध्ये हे प्रमाण कमी झालेले आढळते. महत्वाची बाब म्हणजे अकोला जिल्ह्यात 2001 व 2011 मध्ये लोकसंख्येचे प्रमाण हे सारखेच आढळून येत आहे.

निष्कर्ष :

1) विदर्भाची लोकसंख्या 2 कोटी 6 लाख 30 हजार 327 वरुन 2011 मध्ये 2 कोटी 30 लाख 3 हजार 179 एवढी झाली आहे.

2) 2001 ते 2011 या 10 वर्षात 23 लाख 72 हजार 852 ऐवढी लोकसंख्या वाढली आहे.

3) 2011 नुसार नागपुर जिल्ह्यात सर्वात जास्त लोकसंख्या आढळून येत आहे.

4) नगापुर, अमरावती, यवतमाळ व बुलढाण जिल्ह्यात लोकसंख्येचे प्रमाण 2011 मध्ये सर्वात अधिक आहे.

5) गडचिरोली जिल्ह्यात लोकसंख्या प्रमाण 2001 च्या तुलनेत 2011 मध्ये घटलेले आहे.

6) विदर्भात फक्त अकोला जिल्ह्यात लोकसंख्या वाढीचे प्रमाण 2001 ते 2011 मध्ये सारखे दिसून येत आहे.

7) विदर्भातील वाढीव लोकसंख्या आळा घातला नाही तर अनेक मोठ्या आव्हानांना विदर्भातील जनतेला समोरे जावे लागेल. त्यामुळे ही वाढीव रोखणे अत्यावश्यक झाले आहे.

संदर्भ :

1) महाराष्ट्र जनगणना अहवाल 2001
2) महाराष्ट्र जणनगना अहवाल सिडी 2011 (इंटरनेट)
3) लोकसंख्याशास्त्र : डॉ. काचोळे दा.धो.
4) महाराष्ट्राचा भूगोल : के. सागर
5) लोकसंख्या : प्रा. अहिरराव, अलीझाड
6) जनसंख्या भूगोल : चंदना आर.सी.